।। विद्या विनयेन शोभते ।।
SHETH T. J. EDUCATION SOCIETY'S
**SHETH NANJIBHAI KHIMJIBHAI THAKKAR THANAWALA COLLEGE OF COMMERCE &
SHETH JAYANTILAL TRIBHOVANDAS THANAWALA COLLEGE OF ARTS**
Kharkar Ali, Thane (W) - 400 601
A Linguistic Minority Institute, Recognized under 2(f) and 12(b) of the UGC act 1956
Tel.: 25431119, Website : www.nktdegreecollege.org Email:- nkttdg@yahoo.co.in
Re-Accredited by NAAC with CGPA 2.62, B+ Grade (3rd Cycle)
ISO 9001: 2015 Certified

Dr. DILIP M. PATIL
M.Sc. Ph.D.
PRINCIPAL

---

**शेठ एन. के. टी. टी वाणिज्य महाविद्यालय आणि शेठ जे. टी. टी कला महाविद्यालय, ठाणे**

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केल्या बद्दलचा अहवाल

शेठ टी. जे. एज्युकेशन सोसायटीच्या शेठ एन. के. टी. टी. वाणिज्य महाविद्यालय आणि शेठ जे. टी. टी. कला महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा , परिपत्रक क्र. मभापं-२०२१ / प्र. क्र . १३६ / भाषा -२ दिनांक २२ डिसेंबर २०२१ अनुसार ऑनलाईन माध्यमातून (१४ जानेवारी २०२२ ते २८ जानेवारी २०२२) साजरा करण्यात आला. या पंधरवड्यात विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी विविध कार्यक्रमांचे आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी एकूण सहा स्पर्धा घेण्यात आल्या.आणि या कार्यक्रमामध्ये एकूण २५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या पंधरवड्या अंतर्गत सर्वप्रथम १५ जानेवारी २०२२ रोजी विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी प्रशमंजुषा स्पर्धेचे गुगलफॉर्मद्वारे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये मराठी साहित्य आणि साहित्यिक, महाराष्ट्रातील गडकिल्ले, महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे तसेच महाराष्ट्र जिल्ह्या शी निगडित असे अनेक प्रश्न विचारले होते. या स्पर्धेला शिक्षकांनी ही उत्तम असा प्रतिसाद दिला.

दिनांक २२ जानेवारी २०२२ रोजी विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला ही विद्यार्थ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. निबंधलेखनासाठी १) महाराष्ट्राची संस्कृती आणि संतवाणी २) व्यायामाचे जीवनातील महत्व ३) महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे जतन : काळाची गरज असे विषय देण्यात आले होते. यास्पर्धेसाठी सौ. चैताली पाटील यांनी परीक्षक म्हणून कार्य केले. निबंधलेखन स्पर्धेतील विजेत्यांची नावे पुढील प्रमाणे :- प्रथम क्रमांक:– शुभांगी हिरवे FYB.COM D,द्वितीय क्रमांक :– तनुजा तांडेल TYBA A, उत्तेजनार्थ :– आदिती घुगरे FYBA A.

दिनांक २२ जानेवारी २०२२ रोजी कथा लेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेलाही विद्यार्थ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.कथा लेखनासाठी विद्यार्थ्यांना विषयाचे बंधन नव्हते . यास्पर्धेसाठी सौ. सिद्धी वळंजू यांनी परीक्षक म्हणून कार्य केले. कथा लेखन स्पर्धेतील विजेत्यांची नावे पुढील प्रमाणे :-
प्रथम क्रमांक :— विधी हरड ,FYBCOM B, द्वितीय क्रमांक :— तनुजा तांडेल , TYBA A
उत्तेजनार्थ :— संस्कृती भांगले .

दिनांक २४ जानेवारी २०२२ रोजी विद्यार्थ्यांसाठी स्वरचित काव्य वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यास्पर्धेचे परीक्षण सौ. अदिती मोने आणि श्री. अमित जाधव यांनी केले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी स्वलिखित कविता सादर केल्या. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांची नावे पुढील प्रमाणे –

प्रथम क्रमांक :- तन्वी बोभाटे , TYBSC IT, द्‌वितीय क्रमांक :- सिद्धी भामरे , TYBA A

दिनांक २८ जानेवारी २०२२ रोजी घोषवाक्यलेखन आणि पोस्टर तयार करणे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धेलाही विद्यार्थ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.घोषवाक्य लेखनासाठी १) माय मराठीचे जतन २) कोरोना प्रादुर्भाव प्रतिबंध असे विषय देण्यात आले होते . या स्पर्धेसाठी सौ . गीतांजली चिपळूणकर आणि वृषाली घोडके यांनी परीक्षक म्हणून काम केले. घोषवाक्य लेखन आणि पोस्टर बनवणे स्पर्धेतील विजेत्यांची नावे पुढील प्रमाणे :-

प्रथम क्रमांक :- सिद्धी भामरे , TYBA A , द्‌वितीय क्रमांक :- तन्वी बोभाटे , TYBSC IT

उत्तेजनार्थ ::- अहिल्या केणी , FYBA A , तन्वी भोईर, FYBA A

वरील स्पर्धांमध्ये विजेते झालेल्या सर्व स्पर्धकांना २७ फेब्रुवारी २०२२ या मराठी भाषा गौरवदिन या दिवशी प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येईल.

मराठी वाङमय मंडळाअंतर्गत या मराठी भाषा संवर्धनपंधरवड्याचे आयोजन करण्यात आले . या संपूर्ण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच उपप्राचार्य डॉ. धनश्री सावंत यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देऊन चांगल्या प्रकारे कार्यक्रमात योगदान दिले. तसेच या कार्यक्रमामध्ये मराठी वाङ्मय मंडळाच्या सदस्य सौ सुमती कांबळे आणि इतर प्राध्यापक सौ . गीतांजली चिपळूणकर, सौ वृषाली घोडके , सौ. अदिती मोने, श्री. अमित जाधव, सौ. सिद्धी वळंजू आणि सौ. चैताली पाटील यांनी विद्‌यार्थांना मार्गदर्शन करुन संपूर्ण कार्यक्रम उत्स्फूर्तपणे पार पाडण्यास सहकार्य केले.

विद्यार्थ्यांनी या साजरा केलेल्या पंधरवड्या बद्दल आपले मनोगत व्यक्त केले. मी मराठी वाङ्ग्य मंडळाची समन्वयक या नात्याने व्यवस्थापनाचे, प्राचार्यांचे, उपप्राचार्यांचे, सर्वशिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे, सर्वपरीक्षकांचे, तसेच माझे मराठी वाङ्ग्य मंडळाचे शिक्षक सदस्य आणि माझे सर्व विद्यार्थी सदस्य यांचे मी मनापासून आभार मानते.

PRINCIPAL
SHETH T.J. EDUCATION SOCIETY'S
SHETH N.K.T.T. COLLEGE OF COMMERCE &
SHETH J.T.T. COLLEGE OF ARTS, THANE (W)

सौ. सोनाली सराफ
समन्वयक, मराठी वाड़मय मंडळ

SHETH N.K.T.T. COLLEGE OF COMM & SHETH J.T.T. COLLEGE OF ARTS · THANE

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा














